**प्रेस नोट दि. १८/०६/२०१९**

## कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे शहर.

**हॉटेलमध्ये चोरी करणाऱ्या इसमांस सीसीटीव्ही फुटेज वरुन केले जेरबंद**

दि. १६/०५/२०१९ रोजी कोरेगाव पार्क पो.स्टे पुणे शहर गुन्हा रजि. क्रं २०१/२०१९ भादवि कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल असुन दाखल गुन्हयातील फिर्यादी नामे सौरभ संजय रॉय, रा. ग्रॅण्ड ममाज कॅफे, तिसरा मजला, साऊथ मेन रोड, कोरेगाव पार्क, येथे ग्रॅन्ड ममाज नावाचे हॉटेल आहे. दिनांक १५/०६/२०१९ रोजी रात्री १२/०० वा. चे सुमारास सदरचे हॉटेल बंद झाल्यानंतर दिनांक १६/०६/२०१९ रोजी रात्रौ ०२/१७ वा. चे सुमारास हॉटेलचे एका अज्ञात इसमाने वॉल कंपाऊंडवरुन उडी मारुन हॉटेलचे मुख्य दरवाजातुन हॉटेलमध्ये प्रवेश करुन कॅश काऊंटरचे खालील बाजुस ठेवलेले रोख रक्कम ९०,०००/- रुपये व ३०,०००/- रुपये किंमतीचे i ball कंपनीचे पाच मोबाईल टॅब तसेच एक एक्साईज व्हिजीट बुक असा एकुण १,२५,०००/- रुपये किंमतीचा ऐवज असलेली लोखंडी तिजोरी चोरी करुन चोरुन नेली. म्हणून अज्ञात इसमाविरुध्द वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरचा गुन्हा दाखल होताच कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनकडील पोलिस निरीक्षक (गुन्हे) श्री गणेश माने व तपासपथकाचे कर्मचारी याचे सह घटनास्थळी रवाना होवून घटनास्थळाचे निरीक्षण केले तसेच हॉटेल कर्मचारी याचेकरवी सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता एक इसम हॉटेलचे वॉल कंपाऊंडवरुन उडी मारुन हॉटेलचे मुख्य दरवाजातुन हॉटेलमध्ये प्रवेश करुन कॅश काऊंटरमधील लोखंडी तिजोरी घरफोडी चोरी करुन घेवून जात असल्याचे निदर्शनास आले. सदर इसमा बाबत हॉटेलचे कर्मचारी व फिर्यादी यांचेकडे चौकशी केली असता, सदर इमस हा पूर्वी हॉटेल मध्ये काम करणारा आदिनारायण यादव, रा. बी.टी.कवडे रोड, घोरपडी गाव, पुणे हा असल्याचे संशय आला त्यानंतर गणेश माने पोनि गुन्हे यांनी तपासपथकाचे कर्मचारी पो ना २१८४ साळुंके, पोशि ७५२३, सावंत,पोना गायकवाड यांचेसह आरोपीचे राहते घरी वानवडी येथे जावून त्यास ताब्यात घेवून अटक करुन चोरीस गेलेला मुद्येमाल हस्तगत केला सदर ची कारवाई हि मा पोलीस उपआयुक्त सो परि-२ पुणे, मा. सहा पोलीस आयुक्त, लष्कर विभाग तसेच वपोनि मदन बहाद्यरपुरे व पोनि(गुन्हे) गणेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली तपासपथकाचे कर्मचारी पो ना २१८४ साळुंके, पोशि ७५२३, सावंत,पोना गायकवाड यांनी केली. पुढील तपास महिला पो.उप-निरी. कल्याणी शिंदे या करीत आहेत.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे शहर.